हिंद दी चादर कार्यक्रमाच्या पूर्वतयारीचा लोकप्रतिनिधी व मान्यवरांकडून आढावा >> पान 2

हिंद-दी-चादर' जागतिक पातळीवरील ऐतिहासिक सोहळा ठरावा : विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर >> पान 3

हिंद-दी-चादरचा विचार प्रत्येक घरापर्यंत पोहोचवा विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांचे निर्देश >> पान 4

**सुविचार**

आईसारखे दुसरे श्रेष्ठ दैवत नाही.

दैनिक

# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 163 ■ सोमवार, दि. 19 जानेवारी 2026 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006



आगामी चित्रपटाच्या यशासाठी दिग्दर्शिका सौंदर्या रजनीकांत साई चरणी लीन, दर्शनासाठी पुढच्या वेळी वडिलांनाही घेऊन येणार

आतील पान

# महापौर आरक्षण सोडत लांबणीवर?

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या महापालिका निवडणुका पार पडल्या आहेत. मुंबईसह राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुकांचा निकाल १६ जानेवारीला जाहीर झाला आहे. महापालिका निकाल जाहीर होऊनही महापौर पदाचं आरक्षण जाहीर झालेलं नसल्यानं गोंधळाचं वातावरण कायम आहे. नियमित प्रक्रियेप्रमाणं निवडणूक जाहीर होण्यापूर्वी महापौर पदाचं आरक्षण जाहीर केलं जातं. यावेळी मात्र तसं झालं नसल्यानं गोंधळात वाढ झालीय. मुंबई महापालिका निवडणुकीत महायुतीला काठावरील बहुमत मिळालं आहे. महापालिका निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेनं त्यांचे नगरसेवक मुंबईतील त्यांच्या एका हॉटेलमध्ये ठेवले आहेत. महापौर पदाचं आरक्षण लांबल्यास नगरसेवकांचा हॉटेलमधील मुक्काम वाढण्याची शक्यता आहे.

महानगरपालिका निवडणुकांचे निकाल जाहीर होऊन ४८ तास होऊन गेले आहेत. मात्र, महापालिकांच्या महापौर पदाचं आरक्षण जाहीर झालेलं नाही. महापौर पदाची सोडत निवडणूक होण्यापूर्वी काढणं अपेक्षित होतं. नगरविकास विभागानं महापौर पदाची सोडत काढण्याची तयारी केली असल्याची माहिती आहे. नगरविकास विभागाला राज्य सरकारच्या आदेशाची प्रतीक्षा असल्याची माहिती सूत्रांकडून येत आहे. यामुळं महापौरपदाच्या आरक्षणाबाबत संभ्रम आणि गोंधळ कायम आहे.



महापौर पदाचं आरक्षण रखडल्यानं सोडत निघेपर्यंत नवनिर्वाचित सदस्यांना नगरसेवक म्हणून शपथ देखील घेता येत नसल्याची माहिती आहे. आरक्षण जाहीर झाल्यानंतर निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची नियुक्ती, मुख्य सभा बोलावणे आणि निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर करणं यासाठी १५ दिवसांचा वेळ लागतो. त्यामुळं जानेवारीच्या अखेरपर्यंत किंवा फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यापर्यंत महापौर निवडीचा सस्पेन्स कायम राहणार आहे.

महायुतीनं मुसंडी मारत मुंबई महापालिकेतील ठाकरेंच्या शिवसेनेला हादरा दिला. २५ वर्षांची मुंबई महापालिकेतील ठाकरेंची सत्ता घालवण्यात भाजपला यश आलं आहे. मुंबईच्या महापौरपदाचा प्रश्न महायुती कसा सोडवणार याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे.

मुंबई महानगरपालिका निवडणुकीत महायुतीला ११८ जागांवर यश मिळालं आहे. मुंबई महापालिकेची सदस्यसंख्या २२७ असल्यानं बहुमताचा आखडा ११४ इतका आहे. भाजपनं ८९ जागांवर विजय मिळवला तर एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेनं २९ जागांवर यश मिळवलं आहे. दुसरीकडे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षानं ६५ जागांवर विजय मिळवला. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेनं ६ जागांवर यश मिळवलं आहे. काँग्रेसला २४ जागांवर विजय मिळाला.

एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेनं त्यांचे नगरसेवक मुंबईतील हॉटेलमध्ये ठेवले आहेत. याबाबत एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेनं २९ पैकी २० नगरसेवक पहिल्यांदा निवडून आल्यानं त्यांच्या प्रशिक्षणासाठी त्यांना हॉटेलमध्ये ठेवल्याचं सांगण्यात आलं आहे.

## नवी मुंबईत तिरूपती देवस्थानाला ३.६ एकर भूखंड एक रुपयात



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** देशातील सर्वात श्रीमंत देवस्थानांपैकी एक तिरुमला तिरूपती देवस्थानम बोर्डला नवी मुंबईत पद्मावती अम्मावरी मंदिर उभारण्यासाठी केवळ १ रुपया प्रति चौ.मी. दराने ३.६ एकर भूखंड देण्याचा निर्णय मंत्रिमंडळाच्या शनिवारी झालेल्या बैठकीत मंजूर करण्यात आला. हा भूखंड उलवे नोड, सेक्टर १२ येथे असून, याबाबतचा प्राथमिक निर्णय २९ फेब्रुवारी २०२४ रोजी झाला होता. तेव्हा सरकारने सिडकोच्या भूमूल्य व भूविनियोग धोरणानुसार भूखंडाची किंमत आकारण्याचा निर्णय घेतला होता. तिरुमला तिरूपती देवस्थानम बोर्डाने व्यंकटेश्वरा मंदिरासाठी मिळालेल्या भूखंडाप्रमाणेच पद्मावती अम्मावरी मंदिरासाठीही नाममात्र दराने भूखंड देण्याची आणि इतर शुल्क व सेवा कर माफ करण्याची मागणी सिडकोकडे केली होती. सिडकोच्या प्रस्तावास मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. उलवे येथे मंदिर उभारल्यास पर्यटनाला चालना, परिसराला धार्मिक–सामाजिक महत्त्व आणि स्थानिक विकासाला प्रोत्साहन मिळण्याची शक्यता आहे. तसेच देवस्थानाच्या माध्यमातून परिसरात विविध सामाजिक उपक्रमही राबवले जाणार असल्याचे प्रशासनाने सांगितले आहे.




## नागपूर टी–२० कर्णधार सूर्यकुमार यादवसाठी अखेरची संधी?

**नागपूर /प्रतिनिधी :** भारतीय टी–२० संघाचा कर्णधार आणि आक्रमक फलंदाज सूर्यकुमार यादव सध्या आपल्या कारकिर्दीतील कठीण टप्प्यातून जात आहे. सातत्याने अपयशी ठरत असलेला फॉर्म, वाढता दबाव आणि टी–२० वर्ल्ड कप २०२६च्या पार्श्वभूमीवर निवडकर्त्यांची चिंता या सगळ्यांच्या केंद्रस्थानी आता सूर्यकुमार आहे.

विदर्भ क्रिकेट असोसिएशन (व्हीसीए) जामठा स्टेडियमवर येत्या २१ जानेवारी रोजी होणाऱ्या आगामी सामन्यांमधून तो पुन्हा 'मिस्टर ३६०' म्हणून ओळख मिळवू शकतो का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. आकडेवारी पाहता, २०२५ हे वर्ष सूर्यकुमारसाठी अत्यंत निराशाजनक ठरले आहे. या वर्षात त्याने खेळलेल्या २१ टी–२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये केवळ १९ धावा प्रति डाव अशी सरासरी नोंदवली असून, एकूण धावसंख्या १२३ इतकीच आहे. स्ट्राइक रेट समाधानकारक असला तरी सातत्याचा अभाव स्पष्टपणे जाणवतो.

२०२४ मध्ये ज्या प्रकारे त्याने धावांचा पाऊस पाडला होता, त्याच्या तुलनेत सध्याची कामगिरी निवडकर्त्यांसाठी चिंताजनक आहे. नागपूरमध्ये सामन्यासाठी भारतीय संघाचे काही खेळाडू शनिवार,१७ जानेवारीलाच नागपूरमध्ये आले. रविवार,१८ जानेवारीला सकाळी भारतीय खेळाडूंनी सरावही केला. यात सूर्यकुमार यादव यानेही पुन्हा फॉर्म परत मिळविण्यासाठी कसून सराव केला.

भारतीय संघाच्या मधल्या फळीत सध्या मोठे बदल होत आहेत. काही वरिष्ठ खेळाडू दुखापतीमुळे किंवा विश्रांतीवर असल्याने सूर्यकुमारला पुन्हा एकदा स्वत:ला सिद्ध करण्याची संधी मिळत आहे. मात्र, ही संधीच त्याच्यासाठी अखेरचा इशारा ठरू शकते, अशी चर्चा क्रिकेट वर्तुळात सुरू आहे. जामठा स्टेडियमवरील सामने हे त्याच्या पुनरागमनाचे व्यासपीठ ठरतील की, टी–२० वर्ल्ड कप २०२६पूर्वी त्याच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह निर्माण होईल, हे त्याच्या कामगिरीवरच अवलंबून आहे.

## अवघ्या एका मतानं विजय, ठाकरेंच्या उमेदवारानं 'या' महानगरपालिकेत दिली भाजपाला टक्कर

दैनिक आपला विदर्भ

**परभणी/प्रतिनिधी :** राज्यातील २९ महानगरपालिकांसाठी गुरुवारी मतदान झालं तर शुक्रवारी निकाल जाहीर झाला. राज्यातील काही महानगरपालिकांमध्ये अत्यंत चुरशीची लढत झाली. यापैकीच रंगतदार लढत परभणी महानगरपालिकेत रंगली. परभणी महानगरपालिकेच्या प्रभाग '१३अ'मध्ये शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या उमेदवारानं भाजपाच्या तिकिटावर निवडणूक लढवणाऱ्या उमेदवाराचा अवघ्या एका मतानं पराभव केला. प्रत्येक निवडणुकीत एका मताला किती किंमत असते याचं महत्त्व यातून दिसून आलं. प्रत्येक मताला महत्त्व असतं. त्यामुळं मतदान करणं महत्त्वाचं आहे,

अवघ्या एका मतामुळं झाला पराभव : परभणी महानगरपालिका निवडणुकीत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून व्यंकट दहाळे निवडणूक लढवत होते. तर भाजपाकडून प्रसाद नागरे निवडणुकीच्या रिंगणात उतरले होते. महानगरपालिका निवडणुकीत शिवसेना (उबाठा) पक्षाच्या व्यंकट दहाळे यांना ४,३१२ मतं मिळाली. तर त्यांचे प्रतिस्पर्धी भाजपा उमेदवार प्रसाद नागरे यांना ४,३११ इतकी मतं मिळली. भाजपाच्या नागरे यांना शिवसेनेच्या (उबाठा) दहाळे यांच्यापेक्षा अवघं एक मत कमी मिळाल्यामुळं त्यांचा निवडणुकीत पराभव झाला. या प्रभागात शिवसेनेचे उमेदवार मोहन सोनावणे यांना १,३६३ मतं मिळाली, तर ११३ मतदारांनी 'नोटा' चा पर्याय निवडला, अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी दिली.

महानगरपालिकेत शिवसेनेला (उबाठा) भाजपापेक्षा जास्त जागा : विशेष म्हणजे मराठवाड्यातील परभणी ही एकमेव महानगरपालिका आहे, जिथं शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाला भारतीय जनता पार्टीपेक्षा जास्त जागा मिळवण्यात यश आलं. अन्यथा संपूर्ण राज्यात भाजपानं निवडणुकीत उत्कृष्ट कामगिरी केली आहे. परभणीमध्ये शिवसेनेनं (उबाठा) २५ जागा जिंकल्या तर भाजपानं १२ जागांवर विजय मिळवला.

महानगरपालिकेत भाजपाचं वर्चस्व : महाराष्ट्रातील २९ महानगरपालिकांसाठी गुरुवारी (१५ जानेवारी) मतदान झालं. तर शुक्रवारी (१६ जानेवारी) मतमोजणी झाली. राज्यभरातील महानगरपालिकांच्या अंतिम आकडेवारीनुसार २९ महानगरपालिकामधील एकूण २,८६९ जागांपैकी भाजपानं १,४२५ जागांवर विजय मिळवला. तर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाला १५५ जागा जिंकता आल्या.

## आंतरराष्ट्रीय बास्केटबॉल सामन्यात नातू झळकला, शरद पवारांनी टीव्हीवर 'सामना' बघितला; आजी, आजोबांना अत्यानंद

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील महापालिका निवडणुकांचा निकाल नुकताच जाहीर झाला असून या निवडणुकीत शरद पवार आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादीचा मोठा पराभव झाला आहे. विशेष म्हणजे पुणे आणि पिंपरी चिंचवडमध्ये दोन्ही राष्ट्रवादी एकत्र लढल्या असतानाही राष्ट्रवादीला पराभवाचा सामना करावा लागला. महापालिकेच्या निवडणुकांमध्ये शरद पवार कुठेही दिसून आले नाहीत, किंवा पत्रकार परिषदही त्यांनी घेतली आहे. मात्र, राजकीय सामना संपल्यानंतर आता ते आपल्या नातवाचा आंतरराष्ट्रीय बॉस्केट बॉल लीगमधील सामना पाहत आहेत. शरद पवार, पत्नी प्रतिभा पवार आणि जावई सदानंद सुळेंसह नातू विजय सुळेंचा सामना पाहतानाचा व्हिडिओ व्हायरल झाला आहे.

खासदार सुप्रिया सुळेंचा मुलगा म्हणजेच शरद पवारांचा नातू विजय हा बास्केट बॉल खेळाडू आहे. त्याने, आत्तापर्यत अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सहभाग घेतला आहे. आता, थायलंड येथे सुरू असलेल्या बास्केट बॉल लेग्यू स्पर्धेतही खासदार सुप्रिया सुळे यांचे चिरंजीव विजय सुळे हे सीएनएक्स ओरीऑन संघाकडून खेळत आहे. सध्या सोशल मीडियात आजोबा शरद पवार, आज्जी प्रतिभा पवार आणि वडील सदानंद सुळे एकत्रित विजय सुळे यांचा खेळ पाहतानाचा व्हिडीओ व्हायरल झाला आहे. यापूर्वी विजय सुळे अमेरिकेतील



त्यांच्या कॉलेजच्या संघाकडून देखील विविध स्पर्धेत सहभागी झाले होते. परदेशात जाण्यापूर्वी भारतात देखील अनेक राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धेत विजय सुळे यांनी सहभाग घेतला होता.

दरवर्षी थायलंड मधे वॉरियर्स लीग थायलंडचे आयोजन करण्यात येते. या स्पर्धेत स्थानिक आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरील खेळाडू सहभागी होतं असतात. आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळण्यासाठी ही स्पर्धा महत्वाची समजली जाते. बास्केटबॉल खेळाडूंमध्ये मानाची समजल्या जाणाऱ्या या स्पर्धेत यंदा विजय सुळे सहभागी झाले आहेत. दरम्यान, विजय सुळे हा लहानपणापासूनच बास्केट बॉल खेळाचा चाहता असून, सध्या तो आंतरराष्ट्रीय बास्केटबॉल पटू आहे. बास्केटबॉल विश्वात विजयची देशांतर्गत रँकींग २३९१ असून आंतरराष्ट्रीय रँकींग ३७५४ आहे. विजयची उंची १८५ सेमी म्हणजेच ६.१ इंच एवढी आहे. आपल्या नातवाच्या आंतरराष्ट्रीय सामन्याचा आनंद शरद पवारांनी घरी बसून घेतला.

## एकनाथ शिंदे यांना जबरदस्त झटका! नवनिर्वाचित नगरसेविकेवर गुन्हा दाखल

दैनिक आपला विदर्भ

**नाशिक/प्रतिनिधी :** मुंबईत नगरसवेकांची फाटाफूट होऊ नये म्हणून नगरसेवकांना सुरक्षित ठेवण्यासाठी एकनाथ शिंदे यांची धडपड सुरु आहे. अशात एकनाथ शिंदे यांना जबरदस्त झटका बसला आहे. एकनाथ शिंदे यांच्या नवनिर्वाचित नगरसेविकेवर गुन्हा दाखल झाला आहे. नाशिकमधील ही नगसेविका आहे.

नाशिक महानगरपालिकेच्या निवडणुकीत प्रभाग क्रमांक १६ मधून निवडून आलेल्या पूजा नवले यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. पूजा नवले विजयी झाल्यानंतर पराभूत उमेदवाराच्या घरासमोर नवले यांच्या कार्यकर्त्यानी धिंगाणा घातला. एवढ्यावरच नवले यांचे कार्यकर्ते थांबले नाहीत तर पराभूत उमेदवाराच्या घरात शिरून कार्यकर्त्यांनी अील कृत्य करत आग लावण्याचा प्रयत्न केला.

पराभूत उमेदवाराने या प्रकरणी तक्रार दाखल केली. शिंदे सेनेच्या नवनिर्वाचित नगरसेविका पूजा नवले आणि त्यांचे पती प्रवीण नवले यांच्यासह १५ ते २० संशयितांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मतमोजणीच्या दिवशी सायंकाळच्या सुमारास झालेल्या घटनेनंतर पोलिसांकडून तपास करत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कल्याणमध्ये शिवसेना शिंदे गटाचा कार्यकर्त्यावर प्राण घातक हल्ला करण्यात आला आहे. कल्याण पूर्वेतील कैलासनगर परिसरात हा धक्कादायक प्रकार घडला आहे. अंबादास कांबळे असे जखमी कार्यकर्त्याचे नाव आहे. किरण पावशे नावाच्या एका व्यक्तीने मारहाण केल्याचा आरोप करण्यात आला आहे. निवडणुकीत पराभूत झालेल्या एका अपक्ष उमेदवाराचा किरण पावशे हा कार्यकर्ता आहे. या प्रकारामुळे खळबळ उडाली.

नगरपालिका निवडणुकीनंतर नंदूरबारमध्ये राजकीय वातावरण तापले असून, शिवसेना शिंदे गटाचे माजी आमदार शिरीष चौधरी यांना नंदूरबार शहर पोलिसांनी अटक केली आहे. उपनगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीमध्ये शिरीष चौधरी यांच्या चिरंजीव प्रथमेश हे उपनगराध्यक्षपदी निवडून आले होते. त्यादरम्यान काढण्यात आलेल्या रॅलीमध्ये वाद निर्माण झाला होता आणि त्यानंतर माजी आमदार शिरीष चौधरी यांच्या घरावर हल्ला करण्यात आलेला होता. या प्रकरणी परस्परांवर गुन्हे दाखल करण्यात आलेले होते .



याच गुणांतर्गत पोलिसांनी शिरीष चौधरी यांना अटक केलेली आहे. मात्र प्रकृती खालावल्याने त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आलेला आहे. पोलिसांनी याबाबत अधिकृत माहिती दिलेली नाही. मात्र या अटकेच्या कारवाईनंतर शहरात वातावरण ढवळून निघाला आहे.

शिरीष चौधरी यांच्या दादागिरी विरोधात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आमदार अनिल पाटील देखील आक्रमक झाले असून, त्यांनीही गंभीर आरोप केले होते. माजी आमदार शिरीष चौधरी यांच्यावर दरोडा आणि अॅट्रोसिटी अंतर्गत गुन्हा दाखल आला होता, त्या प्रकरणात ही कारवाई करण्यात आली आहे. या प्रकरणात माजी आमदार चौधरी यांनी दाखल केलेल्या गुन्ह्यातील काही आरोपींनाही पोलिसांनी अटक केली आहे. या अटकेमुळे नंदूरबारच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली असून, पोलिसांकडून आता पुढे काय कारवाई करणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## महापालिका निवडणूक : भाजपा सर्वात मोठा पक्ष

अखेर राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुकांचे निकाल उघड होत अपेक्षेनुसार सर्वत्र भाजपचे 'कमळ' फुलले. या निकालांवर दृष्टिक्षेप टाकला असता, एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते ती म्हणजे, जवळजवळ सर्वच महापालिकांमध्ये भाजप अग्रस्थानी आहे. यात अचंबा वाटण्याचे कारण अजिबात नाही. भाजपचे ठाम धोरण आणि वाटचाल हे यश पदरात घालणारच होते. त्यामुळे भाजपवर टीका करणाऱ्या विरोधकांवर संक्रांत येणे, हेही अपेक्षितच होते. राज्यातील २९ पैकी तब्बल २४ महापालिकांवर भाजप-शिवसेना महायुतीने झेंडा फडकावला, यालाच भरघोस यश मिळणे म्हणतात. याचे महत्त्वाचे कारण, कुठलेच यश भाजपच्या डोक्यात जात नाही. जनतेच्या भल्यासाठी निर्धाराने वाटचाल करणे, हा भाजपचा स्थायीभाव आहे. विधानसभा निवडणुकीत जे यश लाभले, त्यानंतरही स्वस्थ बसेल तो भाजप कसला? किंबहुना, तेव्हाच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली प्रदेश भाजप पुढील मोहिमेच्या तयारीला लागले होते. त्याच वेळी भाजपचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी संपूर्ण राज्य पिंजून काढले. नेतेमंडळी केवळ मुंबई-पुण्यात न बसता, राज्याच्या कानाकोपऱ्यात आणि दुर्गम भागात पोहोचली. सर्वसामान्य पक्ष-कार्यकर्त्याला प्रचाराच्या प्रवाहात सोबत घेतले, त्यांच्या समस्या जाणून घेतल्या आणि नव्या कल्पनांना प्रोत्साहन दिले. कार्यकर्त्यांचे हे अभेद्य जाळे हे कायमस्वरूपी निर्माण झाले आहे. पुढील प्रत्येक निवडणुकीत हे नेटवर्क पक्षाला लाभदायी ठरणार आहे, यात शंकाच नाही. त्यातही केवळ निवडणूक प्रचारात सक्रिय राहायचे, हा अन्य पक्षांचा परिपाठ भाजपमध्ये चालत नाही, तर ते कायमस्वरूपी असते. भाजप नेत्यांच्या अभ्यासपूर्ण तयारीचा पहिला फायदा मिळाला, तो नगरपंचायत निवडणुकींच्या निकालात. स्थानिक स्वराज्य संस्था जिंकायच्या आणि पक्षाच्या स्थानिक कार्यकर्त्यांना बळ देत जनतेच्या जीवनावश्यक कामांना प्राधान्य द्यायचे, हे भाजपचे लक्ष्य होते आणि ही रणनीती कमालीची यशस्वी ठरणार, यात शंकाच नव्हती. त्या मोहिमेमुळे नगरपालिकांच्या निवडणुकांमध्ये भाजपने मुसंडी मारल्याने भाजपचा आत्मविश्वास तर वाढलाच. शिवाय, महापालिका निवडणुकांचा मार्गही सुकर झाला. परवा लागलेल्या निकालांनी भाजपचे 'होमवर्क' किती अचूक आहे, हे अधोरेखित केले. हे विरोधकांनाही मान्य करावेच लागेल. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका म्हणजे केवळ सत्ता भोगण्याची संस्थाने नव्हेत, तर जनसेवेचे व्रत पाळण्याची संधी आहे हे लक्षात घेत, भाजपने त्या भावनेतूनच या निवडणुका लढवल्या. १९९२ मधील ७४व्या घटनादुरुस्तीमुळे महापालिकांना घटनात्मक दर्जा मिळाला. नियमित निवडणुका घेणे, आरक्षण व्यवस्था आणि स्वायत्तता यांना कायदेशीर बळ मिळाले. 'महापालिका' संकल्पनेची सुरुवात महाराष्ट्रात होऊन शहरी स्वराज्य संस्थांचा पाया ब्रिटिश काळात घातला गेला आणि त्यानंतर मोठ्या शहरांसाठी महापालिका पद्धत रूढ झाली. महाराष्ट्र राज्य स्थापनेनंतर नागरी प्रशासन अधिक मजबूत करण्यासाठी अनेक शहरांमध्ये महापालिका स्थापन करण्यात आल्या. राजकीय प्रभाव आणि बदलता कल, यामुळे १९८० नंतर महापालिका निवडणुकांमध्ये पक्षीय राजकारण अधिक ठळक झाले. सन २००० नंतर महापालिका निवडणुका राज्य आणि केंद्रातील राजकारणावर प्रभाव टाकणाऱ्या ठरू लागल्या. म्हणून भाजपने या निवडणुकांचे महत्त्व लक्षात घेत परिश्रम घेतले, ते खरेतर अन्य पक्षांनी अनुकरण करावे असे आहेत; पण कसले काय? विरोधकांची उदासीनताही भाजपच्या यशाला हातभार लावते, इतकेच. कोणतीही दूरदृष्टी नसल्यावर विरोधकांना दारुण पराभव स्वीकारण्यावाचून कोणताही पर्याय उरत नाही, असे व्हायचेच. मुंबई, कल्याण-डोंबिवली, उल्हासनगर, मिरा-भाईंदर, नवी मुंबई, पनवेलसह राज्यातील अन्य महापालिका निवडणुकांच्या निकालांकडे दृष्टिक्षेप टाकला असता, भाजपच्या नावापुढे दिसणारे आकडे हा या पक्षावर जनतेचा विश्वास किती दृढ आहे, हे दर्शवणारे आहे. महामुंबईत भाजपचा बोलबाला आहे हे तर सिद्ध झालेच; पण त्याचबरोबर पुणे, पिंपरीतही भाजपच आघाडीवर असल्याचे चित्र बरेच बोलके आहे. प्रादेशिक परिणाम पाहायचे, तर पश्चिम महाराष्ट्रात या निवडणुकीच्या निमित्ताने महायुतीने घवघवीत यश मिळवले. या भागात कोल्हापूर, सोलापूर, सांगली, मिरज, कुपवाड आणि इचलकरंजीमध्ये भाजपने सर्वाधिक जागा मिळवल्या. उत्तर महाराष्ट्राचाही गड भाजपने राखला. इतकेच नव्हे, तर नाशिक महापालिकेत भाजपला स्पष्ट बहुमत मिळाले आणि नागपूरमध्ये विजयाचा चौकार लगावत छत्रपती संभाजीनगरात आपली सत्ता राखली. या सार्वत्रिक विजयाचा खरा मूलमंत्र काय हे कोणी विचारले, तर त्याचे उत्तर म्हणजे काही गुपित वगैरे असे अजिबात काही नाही. 'विकासाचा महामंत्र' हाच या चौफेर विजयाचा मूलमंत्र आहे. भाजपची विकासाची व्याख्या ही विस्तारित, तसेच प्रगल्भ आहे आणि त्याची व्याप्तीही मोठी आहे. दोन-चार किरकोळ कामे म्हणजे विकास, अशी भाजपची विकासाची संकुचित व्याख्या नाही. भाजपच्या दृष्टीने विकास म्हणजे कोणत्याही बाबतीत काळानुसार होणारी सकारात्मक, गुणात्मक आणि दर्जात्मक सुधारणा अथवा प्रगती. ज्यात आर्थिक प्रगती, सामाजिक कल्याण म्हणजे शिक्षण, आरोग्य अशा अनेक पैलूंचा समावेश असतो. याचा अर्थ, केवळ आर्थिक वाढ नसून लोकांच्या जीवनात आणि समाजात होणारी सर्वांगीण सुधारणा. व्यक्ती आणि समाज अधिक सक्षम करणे, हा उद्देश भाजपच्या ध्येय-धोरणातच नव्हे, तर प्रत्येक योजना आणि उपक्रमात डोकावतो. विरोधक जनतेला कितीही गृहीत धरत असले, तरी तो प्रमाद भाजप कधीही करत नाही आणि भविष्यातही कधी चुकून करणार नाही. हे पाहायचे झाले, तर नगर परिषद आणि नगरपंचायतीच्या निवडणुकांचे जे निकाल गेल्या महिन्यात लागले, त्याचा विचार करावा लागेल. त्यात महायुतीचा दणदणीत विजय झाला होता, तर महाविकास आघाडीला पुन्हा एकदा पराभवाचे तोंड पाहावे लागले होते. राज्यात महायुतीचे तब्बल २१५ नगराध्यक्ष निवडून आले, तर महाविकास आघाडीला अवघ्या ४९ जागांवरच समाधान मानावे लागले. एकट्या भाजपचे राज्यात ११९ नगराध्यक्ष निवडून येत, भाजप हा राज्यातील सर्वात मोठा पक्ष ठरला.

# हिंद दी चादर कार्यक्रमाच्या पूर्वतयारीचा लोकप्रतिनिधी व मान्यवरांकडून आढावा

**दैनिक आपला विदर्भ**

**नांदेड/प्रतिनिधी :** तख्त सचखंड श्री हुजूर साहिब नांदेड येथे आयोजित "हिंद दी चादर" श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त होणाऱ्या कार्यक्रमाच्या पूर्वतयारीचा आढावा आज लोकप्रतिनिधी व मान्यवरांनी घेतला.

जिल्हा नियोजन भवनच्या सभागृहात खासदार अशोकराव चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली हिंद दी चादर श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी खासदार डॉ. अजित गोपछडे, आमदार सर्वश्री राजेश पवार व जितेश अंतापूरकर, मुख्यमंत्र्यांचे विशेष कार्य अधिकारी रामेश्वर नाईक, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, हिंद दी चादर कार्यक्रमाचे समन्वयक तथा कार्यकारी अधिकारी जगदीश सकवान, निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर यांच्यासह विविध लोकप्रतिनिधी व अधिकारी उपस्थित होते.

यावेळी अध्यक्षस्थानावरून बोलताना खासदार अशोकराव चव्हाण यांनी श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांचे कार्य तसेच शीख, सिकलीगर, बंजारा, लबाना, सिंधी, मोहयाल, वाल्मिकी, उदासीन व भगत नामदेव वारकरी संप्रदायांचे योगदान अविस्मरणीय ठरावे, यासाठी हिंद दी चादर शहीदी समागम कार्यक्रम यशस्वी करण्याचे आवाहन केले. हा कार्यक्रम राष्ट्रीय एकात्मतेची भावना दृढ करणारा व लोकांच्या स्मरणात राहणारा ठरावा, असे त्यांनी सांगितले. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या पुढाकाराने हा ऐतिहासिक कार्यक्रम होत असून नांदेडचे महत्व लक्षात घेऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली येथे आयोजन करण्यात आले आहे, असे त्यांनी नमूद केले.

या कार्यक्रमासाठी देशभरातून भाविक येणार असून त्यांच्यासाठी ६ नियमित व ५ विशेष विमानसेवा तसेच ५ विशेष रेल्वेगाड्यांची व्यवस्था करण्यात आली आहे.



विमानतळ व रेल्वेस्थानकावर भाविकांना माहितीपत्रक देणे, गुरुद्वारा व कार्यक्रमस्थळाकडे जाण्यासाठी बससेवा उपलब्ध करणे, स्वागतासाठी स्वयंसेवकांची नियुक्ती करणे तसेच मान्यवरांसाठी पासेसची व्यवस्था करण्याबाबत त्यांनी सूचना दिल्या. कार्यक्रमातील सर्व सुविधा विनामूल्य असतील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

मुख्यमंत्र्यांचे विशेष कार्य अधिकारी रामेश्वर नाईक यांनी श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या बलिदानाची माहिती देत राज्यात हिंद दी चादर शहीदी समागम कार्यक्रम नागपूर, नांदेड व मुंबई येथे आयोजित करण्यात येत असल्याचे सांगितले. पहिल्या टप्प्यात ७ डिसेंबर रोजी नागपूर येथे कार्यक्रम झाला असून २४ व २५ जानेवारी २०२६ रोजी नांदेड येथील मोदी मैदानावर भव्य आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाला देशाचे गृहमंत्री अमित शहा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह विविध राज्यांचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, मंत्री, संत-महंत उपस्थित राहणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

यावेळी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी सांगितले की, शीख धर्माचे नववे गुरु 'हिंद-दी-चादर' श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त नांदेड नगरी ऐतिहासिक पर्वाची साक्षीदार ठरणार आहे. ५२ एकरांच्या परिसरात गुरुद्वाराची भव्य प्रतिकृती उभारण्यात येत असून भाविकांच्या सोयीसाठी महालंगर, अत्याधुनिक प्रदर्शन केंद्र, साडेतीनशेहून अधिक स्टॉल्स व आरोग्य शिबिरे उभारली जात आहेत. पार्किंग व वाहतूक व्यवस्थापनावर विशेष भर देण्यात आला असून कोणत्याही भाविकाची गैरसोय होणार नाही, असे त्यांनी सांगितले. सर्व नांदेडकरांनी व भाविकांनी सहकुटुंब या ऐतिहासिक सोहळ्यात सहभागी होण्याचे आवाहन त्यांनी केले.

यावेळी खासदार डॉ. अजित गोपछडे व माजी आमदार अमर राजूरकर यांनीही आपले मनोगत व्यक्त करून आवश्यक सूचना केल्या.

या बैठकीस विविध लोकप्रतिनिधी, नागरिक, अधिकारी व कर्मचारी आदींची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# मुंबईत शिंदेंकडून अडीच वर्षे महापौरपदाचा भाजपाला प्रस्ताव? मंत्री बावनकुळे म्हणाले..

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुकीचा निकाल १६ जानेवारी रोजी जाहीर झाला. या महापालिकांच्या निवडणुकीत मुंबईत भाजपा-शिंदे सेनेच्या युतीला मोठं यश मिळालं, तर ठाकरे बंधूंना मोठा धक्का बसला. यानंतर आता मुंबई महापालिकेच्या महापौर पदावरून मोठ्या घडामोडी सुरू आहेत.

उपमुख्यमंत्री शिंदे यांनी त्यांच्या शिवसेनेच्या सर्व नगरसेवकांना मुंबईतील एका पंचतारांकीत हॉटेलमध्ये ठेवलं आहे. त्यामुळे शिंदेंच्या शिवसेनेने भाजपाकडे अडीच-अडीच वर्षे महापौरपदाचा प्रस्ताव ठेवल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे. या चर्चावर आता भाजपाचे नेते तथा मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. 'शिंदेंच्या सेनेकडून असा कोणताही प्रस्ताव दिलेला नाही', असं चंद्रशेखर बावनकुळे यांनी स्पष्ट केलं आहे.

मुंबई महापालिकेत अडीच-अडीच वर्षे महापौर व्हावा अशी मागणी शिंदेंच्या शिवसेनेने केली आहे का? असा प्रश्न पत्रकारांनी विचारला. यावर बोलताना चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, "आमच्या पार्लमेंट्री बोर्डाकडे अशी कोणतीही मागणी आलेली नाही. आमच्या पार्लमेंट्री बोर्डाची बैठक होईल, आमच्या महायुतीच्या समन्वयक समितीमध्ये एकनाथ शिंदे देखील आहेत, अजित पवार देखील आहेत. त्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि दोन्ही उपमुख्यमंत्री चर्चा होईल. कोणी काय मागणी केली? यावर देखील चर्चा होईल. तसेच एकनाथ शिंदे यांना काही चर्चा करायची असेल तर ते थेट मुख्यमंत्री फडणवीस यांच्याशी चर्चा करतील", असं चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटलं आहे.

मुंबई महापालिका निवडणुकीत शिवसेनेची ३० वर्षाची सत्ता उलथवून टाकण्यात भाजपाला यश आलं. त्यानंतर 'देवाच्या मनात आलं तर शिवसेनेचा महापौर बनेल' असं वक्तव्य उद्धव ठाकरेंनी केलं होतं. तसेच आज संजय राऊतांनी पडद्यामागून बऱ्याच हालचाली सुरू असल्याचं सूचक वक्तव्य केलं. त्यांच्या या वक्तव्याला प्रत्युत्तर देताना चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, "आधी तुम्ही तुमचे निवडून आलेले नगरसेवक सांभाळा. कारण एवढे सगळे तुमचे आमदार फुटले. जे आमदार सांभाळू शकले नाहीत ते नगरसेवक काय सांभाळणार? तुम्ही आमची चिंता नका करू. आमची पार्टी मजबूत आहे", असं म्हणत चंद्रशेखर बावनकुळे यांनी ठाकरेंवर टीका केली.

"आम्ही महायुती म्हणून लढलो आणि जिंकलो आहोत, पाठीत खंजीर खुपसण्याची आमची भूमिका नाही. लोकांनी कौल दिला आहे तो महायुती म्हणून दिला. महायुती म्हणूनच सत्तेत येणार", अशी भूमिका शिंदेंच्या शिवसेनेच्या प्रवक्त्या शीतल म्हात्रे यांनी बोलून दाखवली.तसेच नगरसेवकांना हॉटेलवर ठेवण्यात आल्यासंदर्भातही त्यांनी माहिती दिली. "आमचे जवळपास २० नगरसेवक हे नवखे आहेत, त्यांना मनपाचं कामकाज माहीत नाही. त्यामुळे, त्याच संदर्भाने आम्ही नगरसेवकांसाठी दोन दिवसीय शिबीर घेतलं आहे, त्यासाठी हे नगरसेवक हॉटेलमध्ये आहेत. शिवाय हे सगळेजण उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेतील नगरसेवकांना हरवून आलेत", असंही शीतल म्हात्रे यांनी सांगितलं.

## आगामी चित्रपटाच्या यशासाठी दिग्दर्शिका सौंदर्या रजनीकांत साई चरणी लीन, दर्शनासाठी पुढच्या वेळी वडिलांनाही घेऊन येणार

**शिर्डी/प्रतिनिधी :** तमिळ चित्रपटसृष्टीतील सुपरस्टार रजनीकांत यांची धाकटी कन्या आणि प्रसिद्ध दिग्दर्शिका सौंदर्या रजनीकांत यांनी आज पती उद्योगपती विशागन वनंगामुडी यांच्यासह शिर्डीत येऊन साईबाबांच्या समाधीचे मनोभावे दर्शन घेतले. आगामी फेब्रुवारी महिन्यात प्रदर्शित होणाऱ्या त्यांच्या विद लव या चित्रपटाच्या यशासाठी साईबाबांच्या चरणी प्रार्थना केली.

सौंदर्या रजनीकांतनं घेतलं साईबाबांचं दर्शन : दिग्दर्शिका सौंदर्या रजनीकांत आणि पती विशागन वनंगामुडी यांनी आज सकाळी शिर्डीत येऊन साईबाबांच्या समाधीचे मनोभावे दर्शन घेतल्यानंतर ते आता चर्चेत आले आहेत. तसेच त्यांनी यावेळी साईबाबांच्या द्वारकामाई, गुरुस्थानाचेही मनोभावे दर्शन घेतले. पुढील फेब्रुवारी महिन्यात सौंदर्याचा विद लव हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार असल्यानं या चित्रपटाच्या यशासाठीही सौंदर्यानं साईबाबांच्या चरणी प्रार्थना केली.

# गुरु तेग बहादूर आणि संत नामदेव: मूलभूत विचारांची समानता

"हिंद दी चादर" नांदेड येथे श्री गुरु तेग बहादूर साहिब यांच्या ३५० व्या शहीदी समागमानिमित्त विशेष उपक्रम राबविण्यात येत असून, भारतीय सांस्कृतिक आणि आध्यात्मिक परंपरा ही विविध संत, गुरू आणि विचारवंतांच्या योगदानातून समृद्ध झालेली आहे. या परंपरेत महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायाचे अग्रणी संत नामदेव महाराज (इ.स. १२७०१३५०) आणि शीख धर्माचे नववे गुरु, श्री गुरु तेग बहादूर साहिब (इ.स. १६२११६७५) हे दोन युगपुरुष वेगवेगळ्या काळात जन्मले. या दोघांमध्ये सुमारे तीन शतकांचे कालांतर असले, तरी त्यांच्या जीवनकार्याचा आणि तत्त्वज्ञानाचा अभ्यास केल्यास मूलभूत विचारधारेत लक्षणीय समानता आढळून येते. ही समानता अधोरेखित करण्याच्या दृष्टीने नांदेड येथे आयोजित करण्यात येणारा "हिंद दी चादर" हा विशेष उपक्रम महत्त्वपूर्ण ठरतो.

संत परंपरेचा समान मूल्याधिष्ठान संत नामदेव महाराजांनी आपल्या अभंगांच्या माध्यमातून भक्ती, सत्य, साधेपणा आणि मानवी समता यांचा पुरस्कार केला. त्यांनी जात, वर्ण आणि कर्मकांडांवर आधारित भेदभावाला ठाम विरोध केला. "ईश्वर सर्वत्र आहे" ही भावना




त्यांच्या विचारांचे केंद्रबिंदू होती.

त्याचप्रमाणे श्री गुरु तेग बहादूर साहिब यांनीही ईश्वर एक असून तो सर्व मानवांचा आहे, असा सार्वत्रिक दृष्टिकोन मांडला. त्यांनी धार्मिक असहिष्णुता, अन्याय आणि जबरदस्तीविरुद्ध उभे राहून मानवमूल्यांचे संरक्षण केले.

निर्भयता, सत्यनिष्ठा आणि बलिदान संत नामदेव महाराजांनी सामाजिक अन्यायाविरोधात निर्भयपणे आवाज उठविला. सत्य आणि नामस्मरण हाच खरा धर्म असल्याचे त्यांनी आपल्या रचनांमधून स्पष्ट केले.

श्री गुरु तेग बहादूर साहिब यांनी सत्य, धर्मस्वातंत्र्य आणि मानवी स्वाभिमान यांसाठी सर्वोच्च बलिदान दिले. त्यांनी स्वतःच्या धर्मापुरते मर्यादित न राहता इतर धर्मीयांच्या हक्कांसाठी प्राणांची आहुती दिली. त्यामुळे त्यांना "हिंद दी चादर" म्हणून गौरविण्यात येते.

मानवी स्वातंत्र्य आणि आत्मसन्मान संत नामदेवांनी माणसाच्या अंतःकरणातील शुद्धता आणि आत्मसन्मान यांना सर्वोच्च स्थान दिले. बाह्य आडंबरांपेक्षा अंतर्गत भक्ती व नैतिकता महत्त्वाची असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

गुरु तेग बहादूर साहिब यांनी व्यक्तिस्वातंत्र्य, विशेषतः धार्मिक स्वातंत्र्य, हा मानवी जीवनाचा मूलभूत अधिकार असल्याचा संदेश आपल्या आचरणातून दिला.

"हिंद दी चादर" उपक्रमाचे महत्त्व

नांदेड येथे श्री गुरु तेग बहादूर साहिब यांच्या ३५० व्या शहीदी शताब्दी समागमानिमित्त आयोजित करण्यात येणारा "हिंद दी चादर" हा विशेष उपक्रम केवळ धार्मिक कार्यक्रम नसून सामाजिक सलोखा, राष्ट्रीय एकात्मता आणि सर्वधर्मसमभाव यांचा संदेश देणारा आहे.

या उपक्रमाच्या माध्यमातून गुरु तेग बहादूर साहिब यांच्या त्याग, बलिदान व मानवतावादी विचारांचा प्रसार करण्यात येत असून, त्याचबरोबर महाराष्ट्राच्या संत परंपरेतील संत नामदेव महाराजांच्या विचारांशी असलेली वैचारिक समानता अधोरेखित करण्यात येत आहे.

सामाजिक सलोखा व राष्ट्रीय एकात्मता

संत नामदेव महाराज आणि गुरु तेग बहादूर साहिब यांच्या विचारधारेमुळे समाजात सहिष्णुता, बंधुता आणि समतेची भावना दृढ झाली. या दोन्ही महापुरुषांचे विचार आजच्या बदलत्या सामाजिक परिस्थितीतही मार्गदर्शक ठरतात.

"हिंद दी चादर" या उपक्रमातून विविध धर्म, पंथ आणि समाजघटकांमध्ये परस्पर सन्मान व समन्वयाची भावना वृद्धिंगत करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

संत नामदेव महाराज आणि श्री गुरु तेग बहादूर साहिब यांच्यात जरी तीन शतकांचे कालांतर असले, तरी सत्य, निर्भयता, मानवी स्वातंत्र्य, सामाजिक समता आणि ईश्वरभक्तीची सार्वत्रिक भावना ही दोघांच्या विचारधारेची समान सूत्रे आहेत. नांदेड येथे आयोजित "हिंद दी चादर" श्री गुरु तेग बहादूर साहिब यांच्या ३५० व्या शहीदी समागमानिमित्त विशेष उपक्रम हा या महान परंपरेचे स्मरण करून देणारा व भावी पिढीसाठी प्रेरणादायी ठरणारा उपक्रम आहे.

– प्रभाकर बारहाते,
प्र. जिल्हा माहिती अधिकारी, हिंगोली

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## "हिंद दी चादर" या कार्यक्रमाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांची आज नांदेड आकाशवाणीवर मुलाखत

**नांदेड/प्रतिनिधी :** "हिंद दी चादर" या कार्यक्रमाच्या अनुषंगाने श्री तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम कार्यक्रमाच्या पूर्वतयारीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांची नांदेड आकाशवाणीचे प्रसारण अधिकारी राहुल आत्राम यांनी घेतलेली मुलाखत सोमवार. दि. १९ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ८ वाजून ४० मिनिटांनी नांदेड आकाशवाणीवरून प्रसारित होणार आहे.

श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहिदी समागम कार्यक्रमानिमित्त नांदेड येथील मोदी मैदानावर शासन आणि समाजाच्यावतीने भव्य कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. या कार्यक्रमासाठी देशाचे गृहमंत्री अमित शाह, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ आणि आंध्र प्रदेशचे उपमुख्यमंत्री पवन कल्याण यांच्यासह अनेक मंत्री व संत-महात्मे उपस्थित राहणार आहेत. तरी या कार्यक्रमास सर्वांनी योगदान द्यावे व या कार्यक्रमास जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे.

सर्व नांदेडकर, श्रोत्यांनी ही मुलाखत ऐकावी,असे आवाहन सहायक निदेशक तथा केंद्र प्रमुख विश्वास वाघमारे यांनी केले आहे.

## अध्यक्षांसह ४३ पदाधिकाऱ्यांचे सामूहिक राजीनामे; राणे बंधू एकत्र आल्याने कोकणाच्या राजकारणात मोठा विस्फोट

**नाशिक/प्रतिनिधी :** राणे बंधू एकत्र आल्याने कोकणाच्या राजकारणात मोठा विस्फोट झाला आहे. ओरोस मंडल अध्यक्षांसह ४३ पदाधिकाऱ्यांनी राजीनामे दिले आहेत. कुडाळ तालुक्यातील कुडाळ ग्रामीण तालुकाध्यक्ष आनंद उर्फ भाई सावंत यांच्यासह काही पदाधिकाऱ्यांनी दिले राजीनामे दिल्याने खळबळ उडाली आहे.

सिंधुदुर्ग जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकांची घोषणा होताच आज खासदार नारायण राणे यांनी महायुतीची घोषणा केली. त्यानंतर अवघ्या काही तासांत घेतलेल्या पत्रकार परिषदेत भाजप, शिंदे शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांचा जागावाटप फॉर्म्युला जाहीर करण्यात आला. मात्र, या घोषणेनंतर जिल्ह्यातील भाजपमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले असून, त्याचे पडसाद थेट राजीनामा सत्रात उमटले आहेत. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील भाजपचे ओरोस मंडल अध्यक्ष आनंद उर्फ भाई सावंत यांच्यासह ४३ पदाधिकाऱ्यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे.

नारायण राणे यांच्या मध्यस्थीने दोन्ही राणे बंधू आले एकत्र

राज्यातील नगरपालिका निवडणुकीत लक्षवेधी राहिला तो सिंधुदुर्ग जिल्हा. नगरपालिका निवडणुकीत भाजपा आणि शिवसेना आमने सामने पाहायला मिळाले होते. त्यासोबत राणेंचे दोन्ही पुत्र देखील आमने सामने पाहायला मिळाले. मात्र आता जिल्हा परिषद निवडणुकीत हे दोन्ही पक्ष एकत्र दिसणार आहेत. या दोन्ही बंधूंच्या एकत्रित येण्यात नारायण राणेंची मध्यस्थी यशस्वी ठरलीये. आणि आता सिंधुदुर्गसाठी महायुतीचा फॉर्म्युलाही ठरलाय. ५० जागांपैकी भाजपला ३१ तर शिवसेनेला १९ जागा दिल्या जातील असं राणे बंधूंनी घोषित केलंय. नगरपालिका निवडणुकीत दोन्ही पक्षांमध्ये झालेलं वैर आता संपलं असून दोन्ही पक्ष एकत्रितपणे जिल्हा परिषद निवडणुकांना समोरे जाणार आहेत.

नगरपालिका निवडणुकीत भाजप आणि शिवसेनेनं आपली ताकद लावत एकला चलो रे भूमिका घेतली होती.केवळ एकला चलो नव्हे तर पैसे वाटपाच्या स्टिंग ऑपरेशनपर्यंत गोष्टी गेल्या होत्या. मात्र या निवडणुकीत दोन्ही पक्ष एकत्र लढणार आहेत.

# हिंद-दी-चादर' जागतिक पातळीवरील ऐतिहासिक सोहळा ठरावा : विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर

### कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व माध्यमांनी योगदान द्यावे - जिल्हाधिकारी राहुल कर्डिले

दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी :** नांदेड येथे २४ व २५ जानेवारी रोजी आयोजित करण्यात येणारा "हिंद-दी-चादर" हा कार्यक्रम केवळ मराठवाडा किंवा महाराष्ट्रापुरता मर्यादित नसून, जागतिक पातळीवर भारताची श्रद्धा, बलिदान आणि मानवी मूल्यांची महान परंपरा अधोरेखित करणारा ऐतिहासिक सोहळा ठरणार आहे. श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त आयोजित या भव्य कार्यक्रमाकडे देश-विदेशातील भाविक, संत-महात्मे व मान्यवरांचे लक्ष वेधले जाणार असून, त्यामुळे हा कार्यक्रम जागतिक स्तरावर पोहोचवावा, असे आवाहन विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी केले.

कार्यक्रमाच्या प्रसिद्धी व माध्यम नियोजनाच्या अनुषंगाने आयोजित बैठकीत ते बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर, लातूरचे उपसंचालक (माहिती) विवेक खडसे, जिल्हा माहिती अधिकारी प्रमोद धोंगडे, लातूर जिल्हा माहिती अधिकारी तानाजी घोलप, हिंगोली जिल्हा माहिती अधिकारी प्रभाकर बारहाते, सहायक संचालक श्याम टरके यांच्यासह माध्यम प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विभागीय आयुक्त श्री. पापळकर पुढे म्हणाले की, हा कार्यक्रम प्रत्येक गावागावात, प्रत्येक घरापर्यंत आणि प्रत्येक मुलापर्यंत पोहोचविण्यासाठी सर्व माध्यमांनी समन्वयाने व सकारात्मक दृष्टीकोनातून सहकार्य करावे. माध्यमांची भूमिका या ऐतिहासिक कार्यक्रमात अत्यंत महत्त्वाची असून, समाजाला योग्य दिशा देण्याचे कार्य माध्यमांद्वारे घडू शकते, असेही त्यांनी नमूद केले.

यावेळी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी "हिंद-दी-चादर" अंतर्गत श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम कार्यक्रमासाठी जिल्हा प्रशासनाने केलेल्या सविस्तर नियोजनाची माहिती दिली. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी माध्यमांनी सेवेच्या भावनेतून सकारात्मक योगदान द्यावे,



असे आवाहन त्यांनी केले.

बैठकीदरम्यान माध्यम प्रतिनिधींनी आपली मते मांडली तसेच कार्यक्रमाच्या अनुषंगाने येणाऱ्या अडचणी व सूचनांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

## खरी शिवसेना कोणती आहे, मुंबईनं आरसा दाखविला-प्रियंका चतुर्वेदींचा एकनाथ शिंदेंना टोला

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबई महापालिका निवडणुकीत एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेहून दुप्पटपेक्षा जास्त मिळाल्यानं शिवसेनेच्या (यूबीटी) खासदार प्रियंका चतुर्वेदी यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंना टोला लगावला आहे. ''मुंबईनं महापालिका निवडणुकीनं आरसा दाखविला. खरी शिवसेना कोणती आहे, हे स्पष्ट केलं आहे'', असे खासदार चतुर्वेदी यांनी म्हटलं आहे.

मुंबई महापालिका निवडणुकीत एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेला २९ तर शिवसेनेला (यूबीटी) मनसेसह ६५ जागांवर विजय मिळाला आहे. या मुंबई महापालिका निवडणुकीच्या निकालावरून खासदार प्रियंका चतुर्वेदी यांनी एकनाश शिंदेंच्या शिवसेनेवर निशाणा साधला. त्यांनी म्हटलं,'' मुंबईच्या लोकांना त्यांना (एकनाथ शिंदे) आरसा दाखवून खरी शिवसेना कोणती आहे, हे दाखवून दिलं आहे. प्रत्येकाला वस्तुस्थिती माहिती आहे. एकनाथ शिंदे यांना युती करून पुढं जाण्याशिवाय पर्याय नाही''. शिवसेनेत दुफळी करून झालेल्या शिंदेंच्या शिवसेनेनं केवळ २९ जागांवर विजय मिळविला आहे. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री म्हणून नियुक्ती झाल्यानंतरही शिंदे हे नाराज असल्याचं दिसत असल्याचा दावा खासदार चतुर्वेदी यांनी केला. ''मुख्यमंत्री निवडण्याची वेळ आली होती तेव्हा एकप्रकारचं वाक्युद्ध सुरू होतं. एकनाथ शिंदेंना उपमुख्यमंत्री पदाची जबाबदारी दिल्यानंतरही ते नाराज दिसले होते'', असे खासदार चतुर्वेदी यांनी म्हटलं आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांच्या पक्षाचे विजयी नगरसेवक हे पंचतारांकित हॉटेलमध्ये हलविल्याची चर्चा आहे. अशातच शिवसेनेच्या (यूबीटी) खासदार चतुर्वेदी यांचे राजकीय वक्तव्य महत्त्वाचं मानलं जात आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे मुंबई महापौर पदासाठी दावा करणार असल्याचंही बोललं जात आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महापालिकांच्या निवडणूक निकालानंतरच २९ महानगरपालिकांपैकी २५ महानगरपालिकांमध्ये महायुतीचे महापौर होतील, असा विश्वास व्यक्त केला होता.

मुंबई महापालिकेत असे आहे पक्षीय बलाबल- मुंबई महापालिका निवडणुकीतील एकूण मतदानापैकी भाजपाचा ४५.२२ टक्के वाटा आहे. भाजपा हा मुंबई मनपामधील सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. तर भाजपाचा मित्रपक्ष असलेल्या शिवसेनेनं २९ जागांवर विजय मिळविला आहे. शिवसेनेचा एकूण मतापैकी ५ टक्के वाटा राहिला आहे. तर मुंबई महापालिकेत जवळपास २५ वर्षे सत्ता राहिलेल्या शिवसेना (यूबीटी) आणि मनसेनं एकूण ६५ जागांवर विजय मिळविला.

# हिंद-दी-चादर कार्यक्रम जनजागृती उपक्रमाच्या अंमलबजावणीचा लातूर विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी घेतला आढावा

### लातूर जिल्ह्यातील शाळा, महाविद्यालयांमध्ये मंगळावर, बुधवारी प्रभात फेरीचे आयोजन

दैनिक आपला विदर्भ

**लातूर/प्रतिनिधी :** हिंद-दी-चादर गुरु श्री तेग बहादूर साहिबजी यांचा इतिहास सर्व विद्यार्थी व समाजातील नागरिकांपर्यंत पोहचावा, यासाठी शिक्षण विभागामार्फत विशेष उपक्रमाची जिल्ह्यात अंमलबजावणी सुरू करण्यात आली आहे. या उपक्रमाच्या प्रगतीचा आढावा घेण्यासाठी विभागीय शिक्षण उपसंचालक डॉ. दत्तात्रय मठपती यांच्या अध्यक्षतेखाली विशेष बैठक शनिवारी घेण्यात आली. सर्व आस्थापनांच्या शाळांनी या उपक्रमात सक्रीय सहभाग नोंदविणे



आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

हिंद-दी-चादर गुरु श्री तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त नांदेड येथील मैदानावर २४ व २५ जानेवारी २०२६ रोजी नांदेड येथे भव्य कार्यक्रम राज्यस्तरीय समागम समिती व राज्य शासनाच्या अल्पसंख्याक विकास विभागामार्फत होत आहे. या अनुषंगाने शिक्षण विभागाने हाती घेतलेल्या जनजागृती कार्यक्रमाचा आढावा यावेळी घेण्यात आला. या बैठकीस शिक्षण सहाय्यक संचालक संजय पंचगल्ले, प्राथमिक शिक्षण विभागाचे नोडल अधिकारी संजय पारसेवार, माध्यमिक शिक्षण विभागाचे नोडल अधिकारी मधुकर ढमाले तसेच प्रशासन अधिकारी अशोक कदम व विभाग समन्वयक श्री माधव बाजगिरे हे उपस्थित होते.

राज्य समन्वयक समितीने शिफारस केलेले श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या जीवनावरील गीत सर्व २ हजार ६६६ शाळा व महाविद्यालयांमध्ये दररोजच्या परिपाठात गाण्याच्या सूचना यावेळी देण्यात आल्या. हे गीत सर्व विद्यार्थ्यांना व समाजातील नागरिकांना श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या बलिदानाची ओळख करून देण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरेल, असे डॉ. मठपती म्हणाले.

याशिवाय, जनजागृती मोहीम अधिक प्रभावी करण्यासाठी जिल्ह्यातील सर्व शाळांमधून मंगळवार व बुधवार या दोन दिवसांत रॅली काढण्याचे नियोजन करण्यात आले आहे. या रॅलीद्वारे विद्यार्थी व शिक्षक श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या हिंद की चादर या उपाधीचे महत्त्व व त्यांनी दिलेल्या बलिदानाची माहिती जनतेपर्यंत पोहोचवतील, असे डॉ. मठपती यांनी सांगितले. या बैठकीला सर्व गटशिक्षणाधिकाऱ्यांची ऑनलाइन उपस्थिती होती.


## शब्दकोडे क्र. 67

आडवे शब्द

१. प्रवासात उपयोगी ३. पाण्याचा साठा, तळे ७. बळजबरीचा मुक्काम ११. पाहून पाहून वाईटाचीही सवय होणे १२. धातूचा नाजूक तंतू १३. लाकडाची उत्कृष्ट जात १४. समुदाय, गट १६. एक नैसर्गिक शीतपेय १७. थडगे १८. मृत्यू नसलेला १९. मान, प्रतिष्ठा, बूज २०. सुकुमार २१. चंदन उगाळण्याचा दगड २४. मधली खोली २६. गावातील देवाचा उरुस २७. 'एनओसी' मराठीत ३१. पुढारी ३२. लढाई, चकमक ३३. जागृत, चकमक ३३. जागृत, स्थान ३५. हुशार, चलाख ३७. श्रेष्ठ पुरुष ३९. सुतळीचे कापड ४२. तिंबा! ४४. पुत्र, मुलगा ४६. फसविणे ४८. कान व डोळे ताठ करणे ५०. सैन्याचा मालपुरवठा ५२. वजा ५३. सरस्वतीचे एक नाव ५६. माराची खूण ५७. क्षण (हिंदी) ५८. ओलसर हवा ६०. पुन्हा पुन्हा ६३. ऱ्हस्व असल्यास व्याधी ६४. पुंकेसर ६५. मत्स्य ६७. बोलणे ६९. मुलगा ७०. टाळ्यांचा जोरदार आवाज ७१. अगम्य ७३. खटला ७५. स्तुती करणारा ७६. अस्वल ७७. जन्म, मृत्यू ७८. तटबंदी

उभे शब्द

१. चाहता २. यामुळे रामायण घडले ३. जन्मदात्री ४. नेहमी बुजणारा ५. बाण ६. मृत्यूनंतरचे मुक्कामाचे स्थान ७. ठाण्याचा रहिवासी ८. वाघाची मावशी ९. भीती, भय १०. अजित नावाच्या भारतीय गोलंदाजाचे आडनाव १३. सामोपचार १५. भाताला दिलेला आकार १८. धाकटा भाऊ २०. हुक्की, लहर २१. च्या बरोबर २२. जय-पराजय २३. कर्ज, उपकार २४. फक्त, केवळ २५. जाते फिरतानाचा आवाज २६. जन्मापासून २७. ख्रिसमस २८. शिव्याशाप २९. हत्तीचा शिक्षक ३०. वारा ३२. वर्ष ३४. थंडीने गार पडणे ३६. दारूचा एक प्रकार ३८. आवाज, गोंगाट ४०. रोखलेली नजर ४१. एक जंगली फूल ४३. वरपांगी ४५. सोसाट्याचा वारा ४७. अवाढव्य, भव्य ४९. उणे ५१. नवऱ्याची दुसरी पत्नी ५२. संयम सुटलेला, अधीर ५४. बरणीला लावण्याचे फडके ५५. विहीर, --नलिका ५७. मान्यतापत्र ५९. नंतर ६०. संत ज्ञानेश्वारांनी लिहिलेली प्रार्थना ६१. थेट, सरळ ६२. धोबी ६५. हा जनात सांगावा, विरूद्ध असल्यास मनातच ठेवावा असे म्हणतात ६६. बडबड ६८. नोकरी ७१. शर्त, पण ७२. फोडातील द्रव ७४. डावा



### शब्दकोडे क्र. 66 चे उत्तर

आडवे उत्तर

१.श्रीराम जयराम जयजयराम २.अट १२.हित १३.जनन १४.मम १५.रमावर १६.तबला १७.खस १८.तारा २०.रावण २२.हौस २४.जर २५.कडक २७.गदा २९.खळखळाट ३०.दादला ३१.तुलसीदास ३३.मदन ३४.काजळ ३६.पुरा ३८.हमाल ३९.गारवा ४०.सर्वत्र ४१.हालचाल ४२.महाशय ४४.नफा ४६.पातक ४७.वार ४९.वाकडा ५२.कवच ५४.खरवस ५६.काजळी ५८.कडप्पा ५९.लामणदिवा ६०.रानटी ६२.सखी ६३.लगत ६५.बत्ती ६६.तलवार ६९.मदार ७०.बेकायदा ७२.डाकीण ७३.गरज ७४.सरदार ७५.सदरा ७७.रबर ७८.वंदन ८१.जागरण ८२.रातवा ८३.कारखाना

उभे उत्तर

१.श्रीमंत २.महिला ३.जत ४.राजस ५.मन ६.जनता ७.जम ८.यमराज ९.मरण १०.अवघड ११.टर १७.खसखस १९.रागीट २१.वरदान २३.पाखर २५.कलाकार २६.कमळ २७.गल २८.दासीपुत्र ३१.तुळस ३२.दारा ३३.मलम ३५.जवान ३७.लोलक ३८.हलवा ३९.गायक ४१.हातचलाखी ४३.शवासन ४५.फासळी ४६.पाव ४८.रखवालदार ५०.डाका ५१.चाकवत ५२.कप्पा ५३.आणखी ५५.वरात ५७.जबाबदार ६१.टीकाकार ६२.सरडा ६४.गरजवंत ६७.लवाद ६८.रणरण ६९.मगर ७०.बेसन ७१.यदा ७५.सख्य ७६.राजा ७९.दवा ८०.ताना

# हिंद-दी-चादरचा विचार प्रत्येक घरापर्यंत पोहोचवा
# विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांचे निर्देश

दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी :** शीख धर्माचे नववे गुरु हिंद-दी-चादर श्री गुरु तेग बहादूर साहिब जी यांच्या ३५० व्या ऐतिहासिक शहीदी समागम सोहळ्याचे विचार खेडोपाडी आणि प्रत्येक घरापर्यंत पोहोचले पाहिजेत,असे निर्देश छत्रपती संभाजीनगरचे विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी दिले.

येत्या २४ आणि २५ जानेवारी रोजी नांदेडमध्ये होणाऱ्या या भव्य सोहळ्याच्या प्रसिद्धी कामाचा आढावा घेण्यासाठी आयोजित बैठकीत ते बोलत होते.नांदेड जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडलेल्या या बैठकीत श्री.पापळकर यांनी प्रसिद्धी यंत्रणेला मार्गदर्शन केले.गुरुजींचे विचार जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी पारंपरिक पद्धतींसोबतच नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यावर त्यांनी भर द्या, असेही ते म्हणाले.

### शिक्षण विभागासह विविध माध्यमांचा प्रभावी वापर

कार्यक्रमाच्या व्यापक प्रसिद्धीसाठी शिक्षण विभागाचा सहभाग महत्त्वाचा असल्याचे श्री.पापळकर यांनी नमूद केले.शाळांच्या माध्यमातून प्रभात फेरी,निबंध,चित्रकला,प्रश्नमंजुषा आणि समूहगान असे उपक्रम राबवून विद्यार्थी व पालकांपर्यंत कार्यक्रमाचा संदेश पोहोचवावा.तसेच,शासकीय कार्यालये, पेट्रोल पंप आणि सार्वजनिक ठिकाणी होर्डिंग्ज लावून वातावरण निर्मिती करावी,अशा सूचना त्यांनी दिल्या.



### सोशल मीडियाचा प्रभावी वापर करा

जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांनी नियोजनावर भर दिला.ते म्हणाले,की मुद्रित आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमांसोबतच सोशल मीडियाचा (समाज माध्यमे) प्रभावी वापर करून राज्यासह राज्याबाहेरही या कार्यक्रमाची माहिती पोहोचविणे आवश्यक आहे.

### १० लाख भाविकांची उपस्थिती; आंतरराष्ट्रीय महत्त्व

हिंद दी चादर श्री गुरू तेग बहादूर साहिब जी शहीदी समागम राज्य समन्वय समितीचे समन्वयक रामेश्वर नाईक ऑनलाईन माध्यमातून म्हणाले,की हा कार्यक्रम देश-विदेश पातळीवर अत्यंत महत्त्वाचा आहे.या महासोहळ्यात केवळ शीख समाजच नव्हे,तर सिकलीगर,बंजारा,लबाना, सिंधी,मोहयाल,वाल्मिकी,उदासीन आणि वारकरी संप्रदायातील भगत नामदेव समाज आदी समाजासह इतर समाज असे मिळून सुमारे १० लाख भाविक सहभागी होणार आहेत.त्यामुळे प्रसिद्धीची व्याप्ती मोठी असावी.

### यांची होती उपस्थिती

या बैठकीस जिल्हाधिकारी राहुल कर्डीले, निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर,शहीदी समागम समितीचे शासकीय समन्वयक डॉ. जगदीश सकवान,लातूर विभागाचे प्र.माहिती उपसंचालक विवेक खडसे आणि नांदेड-परभणीचे जिल्हा माहिती अधिकारी प्रमोद धोंगडे, लातूर प्र.जिल्हा माहिती अधिकारी तानाजी घोलप,हिंगोली प्र.जिल्हा माहिती अधिकारी प्रभाकर बारहाते लातूर विभागाचे सहायक संचालक (माहिती) डॉ.श्याम टरके प्रत्यक्ष उपस्थित होते.

तसेच ऑनलाईन माध्यमातून हिंद दी चादर श्री गुरू तेग बहादूर साहिब जी शहीदी समागम राज्य समन्वय समितीचे समन्वयक रामेश्वर नाईक, छत्रपती संभाजीनगर माहिती विभागाचे प्र.उपसंचालक प्रशांत दैठणकर,जिल्हा माहिती अधिकारी डॉ.मिलिंद दुसाने (छत्रपती संभाजीनगर),अरुण सूर्यवंशी (जालना),गोपाळ साळुंखे (धुळे), सुनील सोनटक्के (सोलापूर), डॉ. रवींद्र ठाकूर (जळगाव),विभागीय संपर्क अधिकारी श्रद्धा मेश्राम आणि छत्रपती संभाजी नगर विभागाचे सहायक संचालक गणेश फुंदे यांनी सहभाग नोंदविला.सर्व जिल्हा माहिती अधिकाऱ्यांनी यावेळी आपापल्या जिल्ह्यातील प्रसिद्धी नियोजनाची सविस्तर माहिती सादर केली.

## वृत्तविशेष...

## सांगलीत शिवसेना शिंदे गटाच्या मदतीने महापालिकेत सत्ता स्थापन करण्यात अडचण नाही – मंत्री पाटील

दैनिक आपला विदर्भ

**सांगली/प्रतिनिधी :** निवडणुकीनंतर सांगली महापालिकेत अनपेक्षित परिस्थिती निर्माण झाली पण शिंदे सेना भाजपसोबत येणार असल्याने सांगलीत सत्ता स्थापन करण्यात भाजपला काही अडचण येणार नाही असे भाजपचे नेते आणि सांगलीचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी रविवारी सांगलीत पत्रकारांशी बोलताना सांगितले.

सांगली महापालिकेत भारतीय जनता पक्षाला ७८ पैकी ३९ जागा मिळाल्या त्यामुळे त्यामुळे बहुमतासाठी एका जागेची गरज आहे. शिवसेना शिंदे गटाला दोन जागा मिळाल्याने सत्ता स्थापन करण्यासाठी या दोन जागा मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. यामुळे भाजपचे संख्याबळ ४१ होत आहे. असेही मंत्री पाटील म्हणाले . दरम्यान महापालिकेत सत्तेमध्ये सहभागी व्हायचे असे राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाने ठरवले असल्यास आम्ही त्यांचे स्वागत करू, मात्र त्यांनी सत्तेत काय हवे याबाबत त्यांच्या पक्षाच्या नेत्यांशी चर्चा करावी असा खोचक सल्ला त्यांनी दिला.

दरम्यान, फेब्रुवारी महिन्यात होणाऱ्या जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आज सांगलीमध्ये पालकमंत्री पाटील यांनी जिल्ह्यातील सर्व महत्त्वाच्या पदाधिकाऱ्यांची व आमदारांशी चर्चा केली. जिल्हा परिषद निवडणूकी मध्ये उमेदवार निवड तसेच घटक पक्षांच्या बरोबरच्या युतीबाबत यामध्ये विचार विनिमय करण्यात आला.

यावेळी आमदार सुरेश खाडे, गोपीचंद पडळकर, सत्यजित देशमुख, संघटन मंत्री मकरंद देशपांडे, ग्रामीण जिल्हाध्यक्ष सम्राट महाडिक, दीपक बाबा शिंदे, पृथ्वीराज बाबा देशमुख, जनसुराज्य शक्ती पक्षाचे प्रदेशाध्यक्ष समित कदम, वैभव पाटील, चिमण डांगे, शेखर इनामदार, राजाराम गरुड, डॉ. रविंद्र आरळी यांच्यासह महत्त्वाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## महाराज आता तिकीट द्या नाहीतर दोरी द्या, इथंच.... समर्थकाची अजब मागणी, उदयनराजे भोसलेंना हसू आवरेना

दैनिक आपला विदर्भ

**सातारा/प्रतिनिधी :** राज्यातील १२ जिल्हा परिषद आणि १२५ पंचायत समित्यांच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाला आहे. सातारा जिल्हा परिषद आणि अकरा तालुक्यातील पंचायत समितीची निवडणूक जाहीर झालेली आहे. सातारा जिल्हा परिषदेच्या ६५ जागांसाठी निवडणूक होणार आहे. मसूर जिल्हा परिषद गटाचं आरक्षण सर्वसाधारण प्रवर्ग असं आहे. या गटातून साताऱ्याचे लोकसभा खासदार उदयनराजे भोसले यांचे समर्थक कुलदीप क्षीरसागर तयारी करत आहेत. आज त्यांनी कुलदीप क्षीरसागर यांनी साताऱ्यात जलमंदिर येथे उदयनराजे भोसले यांची भेट घेतली. कुलदीप क्षीरसागर यांनी उदयनराजे भोसले यांच्याकडे उमेदवारी द्या नाहीतर दोरी द्या फास घ्यायला अशी मिश्कील टिप्पणी केली आहे.

साताऱ्यात सुद्धा जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांची रणधुमाळी सुरू आहे. यामध्ये प्रत्येक उमेदवार आपल्याला पक्षाचे तिकीट कसे मिळेल याकडे लक्ष लावून बसले आहेत.खासदार उदयनराजे भोसले यांचे समर्थक कुलदीप क्षीरसागर हे सुद्धा मसूर जिल्हापरिषद गटामधून जिल्हा परिषदेसाठी इच्छुक उमेदवार आहेत.या आधी सुद्धा झालेल्या निवडणुकांमध्ये त्यांनी उदयनराजे भोसले यांच्या प्रचाराची धुरा समर्थपणे सांभाळलेली आहे. या आधी पार पडलेल्या विधानसभेच्या निवडणुकीमध्ये कराड उत्तर विधानसभा मतदारसंघातून कुलदीप शिरसागर हे विधानसभेसाठी उमेदवार म्हणून इच्छुक होते. परंतु उदयनराजे भोसले यांच्या शब्दाला मान देऊन त्यांनी उमेदवारी मागे घेतली होती.त्यामुळे कुलदीप शिरसागर यांनी जोरदार शक्ती प्रदर्शन करत आपल्या उमेदवारीची मागणी उदयनराजे भोसले यांच्याकडे केली.

''आता उमेदवारी द्या नाहीतर दोरी द्या फास घ्यायला इथंच'' अशी मिश्कील टिप्पणी उदयनराजे भोसले यांच्यासोबत बोलत असताना कुलदीप क्षीरसागर यांनी केली. उदयनराजे भोसले यांना कुलदीप क्षीरसागर यांच्या वक्तव्यामुळं हसू आवरले नाही.

## पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात मराठी चित्रपटांना प्रचंड प्रतिसाद

**पुणे/प्रतिनिधी :** पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवा(पिफ)त मराठी चित्रपटांना प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. 'बाप्या', 'जीव', 'तिघी', 'सोहळा' आणि 'गोंधळ', या चित्रपटांना प्रेक्षकांच्या रांगा लागल्या होत्या.

बाप्या, जीव, गोंधळ आणि तिघी हे चित्रपट मराठी चित्रपट स्पर्धेत असून, सोहळा हा चित्रपट 'आजचा मराठी सिनेमा' या विभागात दाखवण्यात आला. गोंधळ या चित्रपटाला प्रेक्षकांची मोठी रंग लागली होती.

व्यक्तीची लिंग ओळख आणि कुटुंब, समाजाच्या मानसिकतेवर संयत पण प्रभावी भाष्य करणारा 'बाप्या' पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवा(पिफ)त मराठी स्पर्धा विभागात प्रदर्शित करण्यात आला. गिरीश कुलकर्णी आणि राजश्री देशपांडे यांच्या प्रमुख भूमिका असलेल्या या चित्रपटाला प्रेक्षकांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला.कोकणातील दापोलीच्या पार्श्वभूमीवर चित्रित करण्यात आलेल्या या चित्रपटात लिंग बदल आणि त्याला समाजाकडून मिळणारा प्रतिसाद या विषयावर प्रकाश टाकण्यात आला आहे.

## बीडमध्ये राष्ट्रवादीला धक्का, एकेकाळच्या पंकजा मुंडेंच्या खास; माजी आमदार संगीता ठोंबरे शिवसेनेत

**बीड/प्रतिनिधी :** जिल्हा परिषद निवडणुकीच्या तोंडावर बीड जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाला मोठी धक्का बसला आहे. माजी आमदार संगीता ठोंबरे यांनी आज उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत जाहीर प्रवेश केला आहे. या प्रवेशावेळी राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाठ हे देखील उपस्थित होते. संगीता ठोंबरे यांच्या प्रवेशामुळं बीड जिल्ह्यात शिवसेनेची ताकद वाढण्यास मदत होणार आहे.

बीड जिल्ह्यात शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला मोठा धक्का बसला आहे. माजी आमदार राहिलेल्या संगीता ठोंबरे यांनी शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश केला आहे. दरम्यान, संगीता ठोंबरे यांच्या प्रवेशामुळं केज विधानसभेमध्ये शिवसेनेला बळ मिळणार असल्याचं बोलले जात आहे. संगीता ठोंबरे यांनी खासदार बजरंग सोनवणे यांच्या मध्यस्थीने राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटात प्रवेश केला होता. आता बीड जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदासाठी संगीता ठोंबरे यांनी शिवसेनेत प्रवेश केला असल्याची चर्चा सुरु आहे.

## संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांची मोठी घोषणा! संरक्षण उत्पादनात खासगी क्षेत्राचा वाटा ५० टक्यांपेक्षा अधिक वाढवण्याचा विचार

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी :** देश खासगी क्षेत्राच्या मदतीने दारूगोळा उत्पादनात सातत्याने प्रगती करत असून दर्जेदार आणि विश्वसनीय उत्पादने तयार करत आहे. त्यामुळे येणाऱ्या काळात सरकार संरक्षण उत्पादनातील खाजगी क्षेत्राचा वाटा ५० टक्के किंवा त्याहून अधिक होईल वाढवण्याचा केंद्र सरकार विचार करीत आहे. खाजगी क्षेत्र त्यांची क्षमता आणि नवोपक्रम पूर्णपणे स्पष्ट दर्शवतात, अशी माहिती केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी दिली.

राजनाथ सिंह यांनी नागपूर येथील सोलर डिफेन्स अँड एरोस्पेस लिमिटेडमध्ये मध्यम क्षमतेच्या दारूगोळा निर्मिती केंद्राचे उद्घाटन करण्यात आले. तसेच यावेळी आर्मेनियासाठी गाईडेड पिनाका रॉकेटच्या पहिल्या तुकडीला हिरवी झेंडी दाखवण्यात आली. यावेळी सोलर इंडस्ट्रीजचे अध्यक्ष सत्यनारायण नुवाल, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे उपस्थित होते. संरक्षण क्षेत्राला आत्मनिर्भर बनवण्यात खाजगी क्षेत्राच्या योगदानाचे सिंह यांनी कौतूक केले. तसेच २०२१ मध्ये भारतीय लष्कराला सुपूर्द करण्यात आलेल्या खाजगी क्षेत्राद्वारे उत्पादित पूर्णपणे भारतीय बनावटीच्या मल्टी-मोड हँड ग्रेनेडचा त्यांनी विशेष उल्लेख केला.

पुढे सांगितले की, सोलर ग्रुपने तयार केलेले नागास्त्र ड्रोन 'ऑपरेशन सिंदूर' दरम्यान वापरले गेले. त्यांनी दहशतवादी लक्ष्यांवर अचूक मारा केला. ज्यामुळे त्यांची क्षमता सिद्ध झाली आहे. त्यांनी नागास्त्राच्या अधिक प्रगत विकासित ड्रोनचे कौतुक केले. भविष्यात गरज पडल्यास ही शस्त्रे देशाच्या शत्रूंसाठी अत्यंत घातक ठरतील, असा विश्वासही सिंह यांनी व्यक्त केला. राजनाथ सिंह म्हणाले की, सोलर कंपनीद्वारे विकसित केल्या जात असलेल्या 'भार्गवास्त्र' काउंटर ड्रोन प्रणालीची यशस्वी चाचणी खाजगी क्षेत्राची तांत्रिक क्षमता दर्शवते. 'पिनाका' क्षेपणास्त्रांची निर्यात सुरू झाली असून ती भारताच्या संरक्षण उद्योगातील निर्यात क्षमता दर्शवते. भारत आता केवळ आयात करणारा नाही तर तो वेगाने निर्यातदार बनण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे, असेही ते म्हणाले. नागपूरला आले असताना सिंह यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याघरी भेट दिली.

### संरक्षण निर्यात २४ हजार कोटी रुपयांपर्यंत

आत्मनिर्भरतेच्या दिशेने सरकारच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे मिळालेल्या परिणामांची माहिती देताना संरक्षणमंत्र्यांनी सांगितले की, देशांतर्गत संरक्षण उत्पादन २०१४ मध्ये केवळ ४६ हजार ४२५ कोटी रुपये होते. त्यात विक्रमी वाढ होऊन सुमारे १.५१ लाख कोटी रुपयांपर्यंत पोहचले आहे. या योगदानापैकी ३३ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त वाटा खाजगी क्षेत्राचा आहे. खाजगी उद्योग आत्मनिर्भर भारताचे ध्येय साध्य करण्यात भागीदार बनत असल्यचेही ते म्हणाले.

## शिवसेना शिंदे गटाचे माजी आमदार शिरीष चौधरी यांना अटक

दैनिक आपला विदर्भ

**नंदुरबार/प्रतिनिधी :** अमळनेरचे माजी आमदार तथा शिवसेनेचे (एकनाथ शिंदे) नेते शिरीष चौधरी यांना नंदुरबारमध्ये काढण्यात आलेल्या विजयी मिरवणुकीतील वादामुळे रविवारी पोलिसांनी अटक केली. त्यांना न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आल्यावर तब्येतीच्या कारणास्तव वैद्यकीय सल्ल्यानुसार मुंबईला बंदोबस्तात नेण्याचे सूचित करण्यात आले आहे.

नंदुरबारमधील राजकीय वाद शिगेला पोहचल्यानतंर आता पोलीस दल कृतीमध्ये आले असून नंदुरबारमध्ये अशांतता पसरविणाऱ्या कोणालाही सोडले जाणार नाही, असा संदेश देत पोलिसांनी थेट शिवसेनेचे नेते माजी आमदार शिरीष चौधरी यांनाच अटक केली आहे. नंदुरबारमध्ये १० जानेवारी रोजी उपनगराध्यक्ष पदाची निवडणूक झाली. या निवडणूकीत माजी आमदार शिरीष चौधरी यांचे पुत्र प्रथमेश चौधरी यांची उपनगराध्यक्षपदी निवड झाल्यानंतर त्यांची मिरवणूक काढण्यात आली. मिरवणूक दरम्यान शहरातील जळका बाजार परिसरात वाद झाला होता. वादाचे रुपांतर हाणामारी आणि किरकोळ दगडफेकीत झाले होते. त्या दिवशी हा वाद पोलीस ठाण्यापर्यत पोहचल्यांतर दोन्ही गटांनी रात्री सामोपचाराची भूमिका घेतली.

परंतु, त्याच रात्री एका गटाने शिरीष चौधरी यांच्या घरावर धारदार शस्त्र आणि पेट्रोल बॉम्बने हल्ला केला. याप्रकरणी दुसऱ्या दिवशी गुन्हा दाखल झाला. त्यानंतर विरोधी गटानेही चौधरी यांच्या गटाविरुध्द गुन्हा दाखल केला. दोन्ही बाजूंकडील असे चार गुन्हे दाखल करण्यात आले. नंतर पोलिसांनी शिरीष चौधरी यांच्या घरावर हल्ल्याप्रकरणी पाच जणांना अटक केली. शिरीष चौधरी यांनी सुरवातीला पोलीस अधीक्षकांना सर्व नगरसेवक आणि पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीमध्ये याबाबत कारवाईचे निवेदनही दिले. यानतंर पत्रकार परिषद घेत हल्ल्यामागे कोणताही राजकीय पक्ष नसून एक बडा राजकीय नेता असल्याचा आरोप केला. होता. मात्र त्याच दिवशी पोलिसांनी शिरीष चौधरी यांना ताब्यात घेतले.

मात्र, त्यांच्या छातीत दुखू लागल्याने त्यांना अटक करण्यापूर्वी खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. संबंधित रुग्णालयाभोवती पोलिसांनी बंदोबस्त तैनात केला होता. डॉक्टरांनी चौधरी यांना मुंबईत हलविण्याचा सल्ला दिला. त्यामुळे पोलिसांनी त्यांना अटक करुन न्यायालयापुढे हजर केले.. न्यायालयाने न्यायालयीन कोठडी सुनावत त्यांना वैद्यकीय सल्लानुसार मुंबईला उपचारासाठी बंदोबस्तात जाण्याचे सुचित केले. शिवसेना नेते माजी आमदार शिरीष चौधरी यांच्या अटकेनंतर वातावरण चांगलेच तापले असून पोलीस आता दोन्ही बाजुच्या गुन्हेगारांवर कारवाईसाठी कंबर कसतांना दिसून येत आहेत. पोलिसांना दोन्ही बाजुच्या संसयिताना अटक सुरु केली आहे.

## शिवसेनेला भाजपाचा महापौर नकोय, संजय राऊतांच्या दाव्यानं खळबळ

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील २९ महानगरपालिकांचा निकाल शुक्रवारी जाहीर झाला. यात महायुतीनं २९ पैकी २५ महानगरपालिकांवर एकहाती सत्ता मिळवली. परंतु, आता महानगरपालिकेत कोणाचा महापौर बसणार यावरून महायुतीमध्ये पेच गडद होताना दिसत आहेत. सगळ्यांचं लक्ष लागलेल्या मुंबई महानगरपालिकेत महायुतीनं बाजी मारली. तर ठाकरे बंधूंनी कडवी झुंज दिली. मुंबईत भाजपाला ८९ तर शिवसेनेला २९ जागा मिळाल्या. यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महायुतीचा महापौर बसणार, असा विश्वास व्यक्त केला. मात्र, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते खासदार संजय राऊत यांनी केलेल्या वक्तव्यामुळं राजकीय वर्तुळात विविध चर्चा होत आहेत.


संजय राऊतांचा महायुतीवर हल्लाबोल : रविवारी संजय राऊत यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी महायुतीवर टीका केली. ''ज्यांनी आमचे आमदार फोडले, त्यांना आता नगरसेवक फुटतील अशी भीती वाटत आहे. आमदारांना त्यांनी सुरतला ठेवलं आणि आता नगरसेवकांना मुंबईतील हॉटेलमध्ये कोंडून ठेवलं आहे. खरंतर त्यांच्यासाठी सुरत हीच सुरक्षित जागा आहे. राज्याचे मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री असतानाही जर नगरसेवक पळवले जाण्याची भीती वाटत असेल, तर ही महाराष्ट्राच्या राजकारणातील एक मोठी हास्यजत्रा आहे,'' असं म्हणत संजय राऊत यांनी महायुतीवर जोरदार हल्ला केला.

त्यांची सुटका झाली पाहिजे : नगरसेवकांची घरवापसी होणार का? असं विचारलं असता राऊत म्हणाले, ''अनेक नवीन नगरसेवक मूळचे शिवसैनिक आहेत. आम्हाला मिळालेल्या माहितीनुसार, भाजपाचा महापौर होऊ नये अशी त्यांची इच्छा आहे. जर नगरसेवकांना हॉटेलमध्ये कोंडून ठेवलं असेल तर संपर्काची वेगवेगळी साधनं आहेत. ज्या नगरसेवकांना हॉटेलमध्ये कोंडून ठेवलं आहे, त्यांची सुटका केली पाहिजे.''

'देवा'ची इच्छा असेल तर... : शनिवारी एका कार्यक्रमात बोलताना शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे म्हणाले होते की, जर 'देवा'ची इच्छा असेल तर त्यांच्या पक्षाचा महापौर होऊ शकतो. तसंच एकनाथ शिंदे यांचा पक्ष त्यांचा मित्रपक्ष भाजपाच्या फोडाफोडीच्या प्रयत्नांना घाबरत आहे.

ठाकरे बंधू एकत्र येणार? : या सर्व घडामोडींच्या पार्श्वभूमीवर संजय राऊत यांनी महत्त्वाचं विधान केले. ''महानगरपालिका निकालानंतर मी उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांची भेट घेतली. तसंच उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्यातही चर्चा झाली. आम्ही तटस्थपणे सर्व हालचालींकडं पाहत आहोत. पण, पडद्यामागं अनेक गोष्टी घडत आहेत. भाजपाकडं कमी बहुमत आहे. राजकारणात बहुमत हे पाण्यासारखं चंचल असतं,'' असं संजय राऊत म्हणाले.

एकनाथ शिंदे नगरसेवकांना करणार मार्गदर्शन : मुंबई महानगरपालिका निवडणुकीनंतर मुंबईत महापौरपदाच्या शर्यतीला वेग आलाय. त्यामुळं एकनाथ शिंदे यांनी त्यांच्या २९ नगरसेवकांना शहरातील एका हॉटेलमध्ये हलवलं आहे. तिथं २९ नगरसेवकांची तीन दिवसांची कार्यशाळा होत आहे. या कार्यशाळेत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे नवीन नगरसेवकांना बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या (बीएमसी) कामकाजाबद्दल मार्गदर्शन करणार आहेत.



ठाकरेंच्या शिवसेनेचे नगरसेवक नॉट रिचेबल? : मुंबई महापालिका निवडणुकीत शिवसेना - उबाठा पक्षाचे निवडून आलेले काही नगरसेवक हे नॉट रिचेबल असल्याची माहिती मिळत आहे. मुंबईत महायुतीला स्पष्ट बहुमत मिळालं असल्यामुळं विरोधी बाकांवर बसण्याची मानसिकता नसलेले शिवसेना - उबाठा पक्षाचे काही नगरसेवक एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेच्या संपर्कात असल्याची माहिती देखील मिळत आहे. त्यामुळंच त्यांचे काही नगरसेवक नॉट रिचेबल असण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. मात्र, याबाबत शिवसेना - उबाठा पक्षाकडून अधिकृत माहिती समोर आलेली नाही. यावर शिवसेना खासदार नरेश म्हस्के यांनी प्रतिक्रिया दिली. ''या संदर्भात मला काहीही माहिती नाही. त्यांच्या नेत्यांनी त्या नगरसेवकांचा शोध घ्यावा,'' असं खासदार नरेश म्हस्के म्हणाले.